# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक ०५/०८/२०१८**

## १) जबरी चोरी :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक ०४.०८.२०१८ रोजी चे ०१.०० वा. चे सुमारास मोदी यांचे घरासमोरील रोडवर, रविनगर कौठा, नांदेड ता. जि. नांदेड येथे, चार अज्ञात चोरटयांनी फिर्यादीची मोटारसायकल आडवुन थापड बुक्याने मारहाण करुन, त्याचे जवळील नगदी ५,७००/- रुपये चा माल जबरीने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी शेख खाजा पि.जैनुद्दीन पाशा, वय ३८ वर्ष, व्यवसाय नौकरी, रा. देगलुर नाका, नांदेड, ता.जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे नांदेड ग्रामीण** गुरनं ३४९/२०१८ कलम ३९४, ३४ भादंविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/ पाटील, मो.क्र.८७८८७३७१५५** करीत आहेत.

## २)सकल मराठा अंदोलना बाबत दाखल गुन्हयाची माहीती :-

**अर्धापूर :-** दिनांक ०३.०८.२०१८ रोजी चे २२.१५ वा. चे दरम्यान खडकुत पाटीजवळ अर्धापूर ते नांदेड जाणारे रोडवर जि. नांदेड येथे, यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन सकल मराठा मोर्चातील आंदोलन कर्त्यानी मराठा समाजाला आरक्षण मिळावे या करीता फिर्यादी हा त्याची बस क्रमांक एम एच ०७ सी-७२४३ मध्ये प्रवासी घेवून जात असतांना सदर आरोपीतांनी बस आडवून दगडफेक करुन काचा फोडून शासकिय मालमत्तेचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी हनमंत गोविंदराव सोनटक्के, वय ४५ वर्ष, व्यवसाय बस चालक, रा.गंगाबेड ता. जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे.अर्धापूर** गुरन १६६/२०१८ कलम ३३६,४२७,३४ भादवी व सह कलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रति. कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोउपनि शेटे मॅडम, मो.क्र. ७०२०२६०१४१** हे करीत आहेत.

## ३) हयगयीने वाहान चालवुन मरणास कारणीभुत (अपघात) :-

**मांडवी :-** दिनांक ०३.०८.२०१८ रोजी चे १८.३० वा. मांडवी ते सारखणी रोड वेअर हाऊस मांडवी जवळ, जि.नांदेड येथे मयत हा सामान आनण्यासाठी त्याची मोटार सायकल क्रमांक एम.एच.२६ बी बी ८८३९ वर जात असतांना नमुद वेळी ठिकाणी कोणत्यातरी अज्ञात वाहनाचे चालकाने हयगय व निष्काळजीपणाने भरधाव वेगाने गाडी चालवून यातील **मयत नामे पवन वसंत राठोड, वय २१ वर्ष रा.मांडवी, जि.नांदेड** यास धडक देवून त्याचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी शिवम वसंत राठोड, वय २१ वर्ष, रा.मांडवी ता.किनवट, जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो. स्टे. मांडवी** गुरन ४९/२०१८ कलम २७९,३०४(अ)भादंवि कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास मपोउपनि/ कोळी मॅडम, मो.नं. ९०४९३९२९२५** हे करीत आहेत.

## ४) कल्याण डे, टाईम बाजार नावाचा मटका जुगार :-

**शिवाजीनगर :-** दिनांक ०४.०८.२०१८ रोजी चे १५.१० वा. चे सुमारास अब्बास यांचे घरा समोर सार्वजनिक रोडवर, नई आबादी नांदेड, ता. जि.नांदेड येथे यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण डे टाईम बाजार डे नावाचा मटका जुगार पैसे लावून खेळत व खेळवित असताना नगदी व जुगाराचे साहित्यासह ४८९० /- रुपयासह मिळुन आले वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/२६९७ माधव नामदेव केंद्रे, स्था.गु.शा.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. शिवाजीनगर** गुरन. १८३/२०१८ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोना/२८०३ चाटे मो.नं. ८६६८९६३९४९** हे करीत आहेत.

## ५) कल्याण नावाचा मटका जुगार :-

**भाग्यनगर :-** दिनांक ०४.०८.२०१८ रोजी चे १५.०५ वा. चे सुमारास यादव कॉम्पलेक्स वर्कस कॉर्नर नांदेड ता.जि. नांदेड ता.जि.नांदेड येथे यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असताना नगदी व जुगाराचे साहित्यासह ८५६० /- रुपयासह मिळुन आले वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/१७०१ सुरेश सुभांजी वाघमारे, स्था.गु.शा.**

**नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. भाग्यगनर** गुरन. २४४/२०१८ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि पंदलवाड मो.नं. ८३०८३६३६०१** हे करीत आहेत.

## ६) तिरट नावाचा जुगार :-

**बिलोली :-** दिनांक ०४.०८.२०१८ रोजी चे १६.२० वा. चे सुमारास बसस्थानक जवळ, बिलोली, जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या तिरट नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना नगदी व जुगाराचे साहित्यासह १९१० /- रुपयासह मिळुन आले वगैरे **फिर्यादी पोना/२३४४ गोविंद दत्तात्रेय लुंगारे,** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. बिलोली** गुरन. २०६/२०१८ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोना/१९८५ शिंदे मो.नं. ९४२१७६१२७४** हे करीत आहेत.

## ७) बेकायदेशिररीत्या गावठी दारू बाळगुन मिळुन आला :-

**मुक्रमाबाद :-** दिनांक ०४.०८.२०१८ रोजी १३.०० वा. चे सुमारास मुक्रमाबाद ते देगलुर जाणारे रोडवर बसस्थानक मुक्रमाबाद, ता.मुखेड जि. नांदेड येथे, यातील आरोपीने विनापरवाना बेकायदेशिररित्या २० लिटर हातभट्टीची गावठी दारु अंदाजे किंमत २००० /- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःच्या ताब्यात बाळगुन मिळुन आला, वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/२००० गुणाची मारोती सुरनर, ने. पो.स्टे.मुक्रमाबाद** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. मुक्रमाबाद** गुरन १४३/२०१८ कलम ६५ (ई) महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/२१९१ चिंतोरे मो.क्र. ९५५२५०१८५७** हे करीत आहेत.

## ८) पाण्यात बुडून मृत्यु :-

**अ) नांदेड ग्रामीण :-** दिनांक ०४.०८.२०१८ रोजी चे १५.०५ वा. चे सुमारास गोदावरी नदी पात्रात साई मंदीरा जवळ, कौठा नांदेड, जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे १.शुभम संजय जगताप, वय १६ वर्ष, २.शिवम गणेश जाधव, वय १५ वर्ष, ३.आनंद मारोती केंद्रे, वय १६ वर्ष, सर्व रा. शिवनगर हिंगोली नाका नांदेड** हे नमुद ठिकाणी गोदावरी नदीचे पात्रात स्नाक करण्यासाठी गेले असता पाण्यात बुडून मरण पावले. वगैरे **खबर देणार पोना/३३७८ प्रविण पंढरीनाथ केंद्रे, पो.स्टे.नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. नांदेड ग्रामीण** आ.मृ. नं. ६९/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोउपनि/जाधव मो.क्र. ९०११३१८५२७** हे करीत आहेत.

**ब) सोनखेड :-** दिनांक ०४.०८.२०१८ रोजी चे १३.०० वा. चे सुमारास हरसद शिवारात, जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे व्यंकट बालाजी शिराळे, वय ४६ वर्ष, रा. बामणी ता.कंधार, जि.नांदेड** हे नमुद ठिकाणी विहीरीवर हातपाय धुनेसाठी गेले असता पाय घसरुन मरण पावले. वगैरे **खबर देणार पंडीत बालाजी शिराळे, रा.बामणी ता.कंधार जि.नांदेड,** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. सोनखेड** आ.मृ. नं. २०/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पाहेकॉ/१६२४ मो.क्र. ९८८१३७२३५९** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४.